# बालविवाह

या विषयावर

डॉक्टर पेची-फिप्सन्‌वाई एम्. डी.

ह्यांनीं दिलेल्या इंग्रजी व्याख्यानाचें मराठी भाषांतर

हिंदुयूनिअनक्लबाच्या एका सभासदानें तयार केलें

तें

विविधज्ञानविस्तार मासिकपुस्तकांत छापिलें

व

सर्व महाराष्ट्रीय जनांच्या उपयोगासाठीं

पुनः प्रसिद्ध केलें.

आवृत्ति २ री प्रती ५१००

मुंबईंत

गणपतकृष्णाजीच्या छापखान्यांत छा०

१८९१

Presented to Maruthi
Granthasangrahalaya Thana
by
Vinayakram Sakharam [illegible]

[illegible] Thana

ग्रंथ संग्रहालय
नं.

# बालविवाह

डॉक्टर पेची-फिप्सन्‌बाई एम्. डी. ह्यांनीं इंग्रजी भाषेंत दिलेलें व्याख्यान.

सद्गृहस्थहो,

सात वर्षांपूर्वीं मी पहिल्यानें या देशांत आलें तेव्हां या देशांतील लोकांच्या रीतीभाती व विचार पश्चिमेकडील राष्ट्रांच्या रीतीभाती व विचार यांहून पुष्कळ अंशीं भिन्न असल्यामुळें त्यांजविषयींची माहिती मिळविल्यास ती फार उपयुक्त होईल असें वाटल्यावरून ती मिळविण्याचा मीं निश्चय केला. त्यापूर्वीं पूर्वेकडील देशांत मीं केवळ मजेखातर व विश्रांतीखातर बराच प्रवास केला होता, व अशा घाईघाईनें केलेल्या प्रवासांत जी कांहीं थोडीशी वरवर माहिती मिळते तिजवरून पूर्वेकडील व पश्चिमेकडील राष्ट्रांच्या रीतीभातींत परस्परविरुद्ध अशा पुष्कळ गोष्टी आहेत हें माझ्या पाहण्यांत आलें होतें. हिंदुस्थानांत आलें तेव्हां माझ्या वैद्यकीच्या धंद्याच्या संबंधानें ह्या देशांतील लोकांच्या गृहस्थितीचें खरें स्वरूप प्रत्यक्ष पाहण्यास मला बरीच सवड मिळेल व तुह्मां लोकांच्या सहवासानें तुमच्या रीतीभाती व स्वभाव ही समजून घेण्यास पूर्वीं कधीं प्राप्त झाली नाहीं अशी अपूर्व संधि मला मिळेल हें मी जाणत होतें. मी आलें त्यावेळीं तुह्मां लोकांच्या रीतीभातींच्या संबंधानें माझ्या मनावर बरा किंवा वाईट असा कोणताच ग्रह झाला नव्हता असें स्पष्टपणें एथें सांगण्यास मला कांहीं एक प्रत्यवाय दिसत नाहीं. फक्त

तुह्मां लोकांच्या रीतीभातींचें निरालस्यपणें ज्ञान प्राप्त करून घ्यावें व त्यांत जें कांहीं बरें दिसेल त्यास बरें ह्मणावें व होईल तेथवर त्याचा आपल्या आचरणामध्यें स्वीकार करावा अशा प्रकारची एकंदरींत माझ्या मनाची स्थिति होती. व आजपर्यंत मी कोणत्याही देशांत गेलें व तेथें शिकण्यासारख्या असलेल्या गोष्टी मी शिकलें नाहीं व माझ्या शिक्षणांत त्यांच्या अनुरोधानें सुधारणा केली नाहीं असें कधींही झालें नाहीं. तुह्मां लोकांच्या गृहस्थितींत देखील अशा रीतीनें माझ्या पाहण्यांत बऱ्याच अशा कांहीं गोष्टी आल्या आहेत कीं त्यांच्या संबंधानें तुह्मां लोकांची मी खरोखर फार तारीफ करतें. ईश्वराची सात्विक भक्ति हा तुह्मां हिंदुलोकांमध्यें एक मोठा विलक्षण गुण आहे आणि त्याबद्दल माझ्या मनांत तुह्मांविषयीं खरोखर एका प्रकारची पूज्यबुद्धि वसत आहे. शिवाय, अनादिकालापासून इतर धर्मांविषयीं समभाव ठेवणें हा जो तुमच्या धर्माचा उपदेश तो तुमच्या अंतःकरणावर पूर्णपणें बिंबलेला असून त्याप्रमाणें तुमचें आचरण होत आहे. ह्या गोष्टीच्या संबंधानें तर सर्व जगांतील लोकांनीं तुमचें अनुकरण करणें हें माझ्या मतें तर अत्यंत इष्ट आहे. कारण, इतर धर्मांच्या संबंधानें हा जो समभाव तुह्मी दाखवीत आहां तो तुमच्या धर्मावर तुमची श्रद्धा कमी आहे, त्याजविषयीं तुह्मी बेफिकीर आहां, ह्मणून नव्हे, तर तुमच्या धर्मावर तुमची पूर्ण श्रद्धा आहे हें मशहूर असून त्याच्या खरेपणाविषयीं तुमची मनोभावें खात्री झालेली असते; तथापि इतर धर्मांच्या संबंधानें समभाव ठेवणें हें जें तुमचें धर्मतत्व तें तुह्मीं अशा रीतीनें पाळीत आहां कीं इतर लोकांच्या धर्मांत कोणत्याही रीतीनें ढवळाढवळ न करितां, त्यां-

शीं मोठ्या प्रीतीनें व सलोख्यानें राहण्यास तुमची नेहमीं तयारी असते.

तथापि, प्रस्तुतप्रसंगीं मला जें कांहीं बोलणें आहे तें तुह्मांमध्यें अशा ज्या कांहीं चांगल्या चाली आहेत त्यांच्या संबंधानें नसून, माझ्या वैद्यकीच्या धंद्याच्या संबंधानें, बालविवाहाची तुह्मांमध्यें फार जारीनें चालू असलेली अनिष्ट चाल माझ्या विशेष पाहण्यांत आली आहे तिच्या संबंधानें चार शब्द बोलण्याची माझी इच्छा आहे. ही तुमच्या इतर चांगल्या चालींप्रमाणें अन्यलोकांनीं अनुकरण करण्यासारखी नाहीं एवढेंच नव्हे, तर तिच्यापासून होणारे तात्कालिक परिणाम अतिभयंकर असून एकंदरींत तुह्मां लोकांच्या भावी स्थितीस पुढें मागें ती इतकी अनर्थकारक होण्याचा संभव आहे कीं तिचा तुह्मीं एकदम अटकाव करणें जरूर आहे. तुह्मांपैकीं खरोखर शहाणे व समजूतदार असे जे लोक आहेत त्यांचे यासंबंधानें माझ्यासारखेच विचार असून ते या कामांत माझे सहायकर्ते आहेत हें मी जाणत आहे. अर्थात् माझी अशी समजूत आहे कीं ही दुष्ट घातकी चाल समूळ नाहींशी करणें इष्ट आहे अशी तुमची खात्री झाली असल्यामुळें त्यासंबंधानें आतां तुमचीं मनें वळविण्याविषयीं विशेष खटपट करण्याची जरूरी राहिली नाहीं. याकरितां या गोष्टीच्या पुष्ट्यर्थ जीं कांहीं प्रमाणें आहेत तेवढींच फक्त आतां मी तुह्मांपुढें मांडतें. माझ्या धंद्यांत मिळविलेल्या प्रत्यक्ष अनुभवावरून ह्या चालीपासून होणारे ता‌त्कालिक परिणाम व मीं संपादन केलेल्या वैद्यकीच्या ज्ञानावरून हिंदुराष्ट्राच्या भावी संततीस ह्या चालीपासून होणारें नुकसान हें मला पूर्ण अवगत

आहेत, आणि हीं तुह्मांस व्याख्यानरूपानें सांगितल्यास तुह्मांस या कामीं कांहीं मदत होईल असें जाणून मीं हा विषय आज हातीं घेतला आहे.

हिंदु लोकांत बालविवाह चालू असल्याबद्दल वर्तमानपत्रांच्या व पुस्तकांच्या वाचनावरून हिंदुस्थानांत येण्यापूर्वींच मला माहित झालें होतें. परंतु ही गोष्ट जेथें जेथें पुस्तकांत किंवा अन्यत्र माझ्या वाचण्यांत आली होती तेथें तेथें असा आणखी एक शेरा माझ्या पाहण्यांत येत असे कीं थंड हवेच्या प्रदेशांतील मुलींपेक्षां हिंदुस्थानांतील मुलींस फार लौकर प्रौढावस्था प्राप्त होते. परंतु मी इकडे येऊन पाहिलें तों वास्तविक प्रकार तसा नसून हिंदु मुली सदरील पुस्तकांत वगैरे लिहिल्याप्रमाणें लौकर प्रौढावस्थेंत येत नाहींत एवढेंच नव्हे तर त्यांच्या शरीराचा बांधा प्रौढ व पक्क अशा दशेंत येऊन पोचण्यास बराच उशीर लागतो, व एखाद्या पंधरा वर्षांच्या हिंदु मुलीची वाढ अकरा वर्षांच्या इंग्रज मुलीच्या वाढीपेक्षां जास्त नसून ती फार तर तिच्या एवढी दिसते न दिसते. यावरून उक्त लेखांच्या संबंधानें मला जें कांहीं आश्चर्य वाटलें असेल त्याची, सद्गृहस्थहो, तुह्मीच कल्पना करा! सारांश, ज्या इंग्रज ग्रंथकारांनीं सदरील लेख लिहिले त्यांस हिंदु लोकांची गृहस्थिति समजण्यास योग्य सवड मिळाली नसावी व त्यांमुळें त्यांचे लेख केवळ भ्रमोत्पादक होत असें ह्मणणें मला प्राप्त झालें. ह्या ग्रंथकारांची पहिल्यानें अशी चुकी झाली कीं हिंदु लोकांत मुली प्रौढावस्थेंत आल्याशिवाय त्यांचा विवाह (पुरूषांशीं संबंध) होत नाहीं असा त्यांचा समज झाला, व दुसरी चुकी अशी झाली कीं हिंदु लोक प्रौढावस्थेचें जें लक्षण (ऋतुदर्शन)

करितात तेंच त्यांनीं ग्राह्य केलें. पहिल्या संबंधानें तुह्मांस माहितच आहे कीं दुर्दैवानें तसा सर्वत्र प्रकार नसून, बऱ्याच (व मुख्यत्वेंकरून गुजराथी) लोकांत तुमच्या मतें जें प्रौढावस्थेचें लक्षण तें देखील प्राप्त होण्याच्या पूर्वींच मुलींचा पुरुषांशीं संबंध होत असतो. दुसऱ्या गोष्टीच्या संबंधानें ह्मणजे प्रौढावस्थेचें खरें लक्षण असें जें त्यांनीं गृहीत केलें त्यासंबंधानें मी तुमची अशी खात्री करून देण्यास तयार आहे कीं तें त्यांचें प्रौढावस्थेचें लक्षण अगदीं चुकीचें आहे. आतां, पहिली गोष्ट ह्मणजे ऋतुदर्शन—ज्याला प्रौढावस्थेचें लक्षण असें समजण्याचा खोटा संप्रदाय पडला आहे तें—होण्याच्या पूर्वींच पुरुषाशीं संबंध ठेवणें (ह्या गोष्टीच्या संबंधानें खरोखर काय बोलावे हें मला समजत नाहीं !) ह्या विषयीं माझेचसे काय पण सर्व पाश्चिमात्य राष्ट्रांचे—सर्व सुधारलेल्या राष्ट्रांचे असें ह्मणण्यास कांहीं प्रत्यवाय तर नाहींना ?— विचार इतके कांहीं सख्त आहेत कीं तो आमच्या मतें पीनलकोडाप्रमाणें शिक्षा करण्यास योग्य असा एक केवळ गुन्हा होतो. सद्गृहस्थहो, कलकत्यांतील फुलमुनीदासीच्या संबंधानें घडून आलेली हृदयद्रावक बिना वाचून तुह्मी सांप्रत तत्संबंधीं चालू असलेल्या कायद्यांत सुधारणा जरूर करावी ह्मणून सरकारांत अर्ज पाठविण्यास प्रवृत्त झाला आहां. परंतु अशा प्रकारच्या कितीएक बिना आजपर्यंत माझ्या पाहण्यांत आल्या आहेत व तुह्मांपैकींही कित्येकांच्या त्या पाहण्यांत आल्या असतील. यांशिवाय दुसऱ्या अशा कांहीं बिना घडून येतात कीं त्यांत मरण बरें पण ती यावज्जीव दीनावस्था व शरीराची तळमळ नको अशी स्थिति कित्येक

स्त्रियांस प्राप्त झालेली असते. सद्गृहस्थहो, अशा अघोर कृत्यांस दासपणाची ह्मणून जी कांहीं शिक्षा ह्मणतात ती देखील कमी आहे असें माझ्याप्रमाणेंच तुह्मांलाही वाटत नाहीं काय ? तुह्मांपैकीं पुष्कळांचे माझ्या सारखेच या संबंधानें विचार आहेत हें पाहून मला खरोखर एका प्रकारचें समाधान वाटत आहे. ह्या विषयाच्या संबंधानें तुह्मांपैकीं पुष्कळांनीं मला आपले विचार कळविले आहेत, व ज्या जातींत विशेषेंकरून असे भयंकर प्रकार घडून येतात अशा जातींतील लोकांनींही सरकार या कामीं हात घालून हा दुष्ट प्रघात बंद करील तर बरें होईल अशी आपली इच्छा माझ्याजवळ प्रदर्शित केली आहे. अशा बाबतींत गुन्हेगारांस योग्य शिक्षा करण्यास जातिनिर्बंधाचा कितपत उपयोग होईल हें मला माहित नाहीं, तथापि मला असें वाटतें कीं साधल्यास या कामीं जातीकडून कांहींतरी योग्य शिक्षा करविण्याची तजवीज होणें अवश्य आहे. जातिनिर्बंधाचें वास्तविक तुह्मांमध्यें इतकें कांहीं प्राबल्य आहे कीं उंच वर्णांतील सुशिक्षित लोकांनीं नेट धरून काम केल्यास ही घातकी चाल समूळ नाहींशी करतां येणार नाहीं असें मला वाटत नाहीं. सद्गृहस्थहो, ह्या घातकी चालीपासून तुह्मां लोकांच्या स्त्रियांची व भावी संततीची खराबी होत आहे एवढेंच नव्हे, तर संसारांत स्त्रीपुरुषांच्या परस्परप्रेमापासून जें कांहीं सुख ह्मणून आहे त्यास देखील तुह्मी या चालीच्या पायीं अगदीं अंतरत आहां असें ह्मणणं प्राप्त आहे. कारण, ज्या पुरुषाच्या अशा प्रकारच्या अविचारी कृत्यापासून एखाद्या स्त्रीस यावज्जन्म दुस्सह क्लेश व यातना भोगाव्या लागतात

त्याच्याविषयीं तिच्या मनांत किती बरें पराकाष्ठेचा तिरस्कार उत्पन्न होत असेल? व अशा स्थितींत परस्पर प्रेम उत्पन्न होण्यास काडीमात्र तरी अवकाश मिळत असेल असें तुह्मांस वाटतें काय? अर्थात् ही लहान अर्भकांवर चोरून छपून अगर उघडपणें बलात्कार करण्याची जी तुह्मांमध्यें चाल आहे ती तुमचें सर्वस्वीं नुकसान करीत आहे. प्राचीन काळीं तुह्मां लोकांत जी सुधारणा झाली होती तिच्यापासून या अमानुष चालीचा स्वीकार केल्यानें तुमची पिछेहाट होत आहे हें तुह्मी जाणत नाहीं. ही चाल तुमच्या धर्मास कलंक लावणारी व तुमच्या माणुसपणास बट्टा आणणारी अशी असून सर्व सुधारलेल्या राष्ट्रांच्या दृष्टीनें—त्यांच्या खरोखर समजण्यांत आल्यास—तुमच्या कीर्तीस काळिमा आणणारी आहे. ह्याकरितां, तुह्मांमध्यें स्वाभिमान किंवा पौरुष ह्मणून कांहीं अवशिष्ट असेल तर लोकापवादाच्या अगर इतर कोणत्याही संबंधानें कांहीं जरी तुमचें नुकसान झालें तरी ही दुष्ट चाल तुह्मांमधून अगदीं नाहींशी करा व तुमच्या कीर्तीस लागलेला हा डाग काढून टाका असें माझें पुनः पुनः तुह्मांस बजावून सांगणें आहे.

ही घातकी चाल तुह्मांपैकीं पुष्कळांस पसंत नाहीं व तुह्मी तिचा तिरस्कार करतां हें मला माहित आहे, तरी ह्याशिवाय अशाच प्रकारची दुसरी एक चाल आहे व तिचा प्रचार अद्याप तुह्मांमध्यें, कांहीं अपवाद शिवाय करून, सार्वत्रिक आहे असें ह्मणतां येईल. ह्मणून ह्या दुसऱ्या चालीविषयींच मी आतां चार शब्द बोलतें. तुह्मी असें ह्मणतां कीं "आमच्या मुली मोठ्या झाल्या, त्यांस ऋतु प्राप्त झाला, ह्मणजे आह्मीं त्यांचा पुरुषांशीं संबंध होऊं देतों." परंतु हें

तुमचें ह्मणणें देखील मला पसंत नाहीं, कारण, ऋतुप्राप्ति हें प्रौढावस्थेचीं जीं एकाहून अधिक लक्षणें आहेत त्यांपैकीं फक्त एक लक्षण व तेंही अगदीं अनिश्चयात्मक असें लक्षण असून, या अशा प्रकारच्या एका लक्षणावरून संपूर्ण प्रौढावस्थेचें तुह्मांकडून अनुमान करण्यांत येतें हें बरोबर नाहीं. अनिश्चयात्मक असें ह्मणण्याचें कारण असें कीं ऋतुदर्शन ह्मणून जें कांहीं आहे त्यांत कोणत्याच प्रकारचा नियमितपणा नसतो व तें केवळ हवा, खाण्यापिण्याची व्यवस्था, व राहण्याचा प्रकार वगैरे बाह्य गोष्टींवर अवलंबून असतें, व शरीराच्या प्रौढ व पक्क अशा स्थितीशीं त्याचा अवश्य असा बिलकुल संबंध नसतो, अर्थात् ही स्थिति प्राप्त होण्यापूर्वींच, वर सांगितलेल्या कारणांवरूनही ऋतुदर्शन होण्याचा अनेक प्रसंगीं संभव असतो. शहरापासून दूर खेडेगांवाच्या वस्तींत राहणाऱ्या एखाद्या तेरा वर्षांच्या मुलीचा बांधा, शहरांतील कोंडलेल्या व रोगी हवेंत राहणाऱ्या एखाद्या अकरा वर्षांच्या मुलीपेक्षां अधिक चांगला जमलेला असून विशेष पूर्णत्वाप्रत आलेला असतो ही गोष्ट खचित कोणाल्यानें नाकबूल करतां येणार नाहीं. तथापि शहरांत राहणाऱ्या त्या अकरा वर्षांच्या खुजट व नाजूक ह्मटलेल्या मुलीस वर सांगितलेल्या बाह्य कारणांवरून ऋतु प्राप्त झाला असल्यामुळें ती स्त्रीत्वाप्रत आली, अर्थात् तिला प्रौढावस्था प्राप्त झाली असें तुह्मी समजतां, व ती खेडेगांवांतील तेरा वर्षांची मुलगी शरीराच्या प्रशस्त वाढीमुळें हिडिंबेसारखी जरी दिसत असली तरी तिला ऋतु प्राप्त न झाल्यामुळें तिची गणना तुमच्या मतें अप्रौढ स्त्रियांतच होत असते. असो, प्रौढाप्रौढावस्थेचें खरें लक्षण तुह्मांस बरोबर समजत नसल्यामुळें तुमच्या

व्यवहारांत अशा प्रकारचा खोटसाळपणा उत्पन्न झाला आहे. ह्या माझ्या ह्मणण्याच्या खरेपणाविषयीं पुरावा देण्यास इंद्रियविज्ञानशास्त्र धुंडण्याची जरूरी नाहीं. फक्त या संबंधाची तुमच्या नेहमी पाहण्यांत येणारी अशी एकच गोष्ट येथें सांगितल्यास तुमची खात्री होणार आहे. ती गोष्ट अशी कीं ऋतुप्राप्ति होण्याबरोबर ज्या मुलींचा पुरूषांशीं एकदम संबंध सुरू होतो त्यांच्यासंबंधानें बहुतेक व्यापकसारखा असा एक नियम आपल्यास दिसून येईल कीं त्यांस कांहीं वर्षेंपर्यंत ह्मणजे खरी प्रौढावस्था प्राप्त होई तोंपर्यंत संतति होत नसते. आतां ऋतुदर्शन व प्रौढावस्था ह्यांच्या संबंधाचा अशा प्रकारचा गैरसमज तुमचाच झालेला आहे असें नाहीं. हा समज अर्वाचीन इंद्रियविज्ञानशास्त्रवेत्ते खेरीज करून बहुशः सार्वत्रिक आहे, ह्मणजे तो सर्व देशांतील लोकांत कमी जास्त मानानें वसत आहे, हें खरें आहे. तथापि उलट पक्षीं एवढें सांगणें रास्त आहे कीं ग्रीक लोक व त्यांच्या मागून उदयास आलेलीं राष्ट्रें यांच्यामध्यें ऋतुदर्शन व संभोगावस्था अशा प्रकारच्या दोन निरनिराळ्या अवस्था मानण्याचा संप्रदाय आहे, व या दोहोंमध्यें कांहीं वर्षांचें अंतर असतें. तसेंच जगामध्यें आजपर्यंत जीं जीं बलाढ्य अशीं राष्ट्रें होऊन गेलीं त्यांच्यामध्यें हा नियम सार्वत्रिक असल्याविषयीं पुष्कळ प्रमाणें देतां येतील. तरी माझ्या ह्मणण्याच्या प्रतिपादनार्थ अमेरिकेंतील एका इंद्रियविज्ञानशास्त्रवेत्त्याच्या ग्रंथांतून एकच उतारा दिल्यास बस होणार आहे.—"प्रौढावस्था ( ह्मणजे तुमचें ऋतुदर्शन नव्हे, तर त्यानंतरची बरीच पूर्णत्वाप्रत आलेली स्थिति ) सुरू होतांच स्त्रियांस संतति होण्याचा संभव असतां, तरी अशा पूर्ववयांत संत-

त्युत्पादनासारखें जोखमाचें काम घडून येणें हें शास्त्र व अनुभव ह्यांस अगदीं संमत नाहीं. पुरुषजातीस ज्याप्रमाणें लहान वयांत जननेंद्रियांचे व्यापार सुरू केल्यास अपकारक होतात व त्यामुळें जरावस्थेचा निश्चयेंकरून शरीरांत प्रवेश होतो, त्याचप्रमाणें स्त्रीजातीस अकालीं मातृत्व प्राप्त होणें हें शुद्ध निरनिराळ्या रोगांस व प्रसंगीं मृत्यूस बोलावूं पाठविण्यासारखें आहे. त्यापासून स्त्रियांचे तर अशाप्रकारें नुकसान होतेंच, परंतु त्याशिवाय त्यांजपासून होणारी जी संतति ती देखील खुजट, नेभळी, रोगी, व अल्पायुषी अशी होते. परंतु तेंच त्यांचें मातृत्व जर कांहीं काळपर्यंत लांबणीवर टाकण्यांत आलें तर त्यांची स्वतांची पूर्वीं सांगितल्याप्रमाणें खराबी न होतां त्यांजपासून होणारी संततिही हाडामासानें मजबूत, कुवतदार, निरोगी, व चिरायुषी अशी होण्याचा विशेष संभव असतो. आणि प्राणीवर्ग असो किंवा वनस्पतीवर्ग असो, त्यांच्यामध्यें साधारण नियम ह्मटला ह्मणजे असाच दिसून येतो कीं त्यांपासून अल्पवयांत झालेली पैदाज बहुधा कनिष्ठ प्रकारची असते. वीस वर्षांचें वय झाल्याशिवाय स्त्रियांचा बांधा नियमेंकरून चांगल्या पूर्ण दशेस येऊन पोंचत नाहीं. पोटाचा खालचा भाग ज्यास ओटी असें ह्मणतात, व जो जननसंबंधीं सर्व व्यापार घडून येण्याचें स्थान, त्याचा पूर्ण आकार त्यांच्या वयाचें सदहू मान झाल्याशिवाय प्राप्त होत नाहीं. ह्मणून ह्या वयाच्या पूर्वींच मातृत्व प्राप्त होणें इष्ट नाहीं. शिवाय मुलांचें योग्य रीतीनें संगोपन करणें हें फार जोखमाचें काम आहे, व तें पार पाडण्यास अवश्य असा बुद्धीचा विकास ह्या वयाच्यापूर्वीं स्त्रियांच्या ठिकाणीं

झालेला नसून कर्तव्याकर्तव्यविचारांचाही एकंदरींत त्यांच्या ठिकाणीं अभावच असतो. ह्या संबंधानें ग्रीक लोकांतील महान् तत्ववेत्ता प्लेटो ह्यानें हजारों वर्षांपूर्वी 'स्त्रियांनीं वीस वर्षांचें वय झाल्यानंतर देशहिताकरितां संतत्युत्पादन करावें' असा जो शहाणपणाचा नियम करून ठेविला आहे तो अर्वाचीन इंद्रियविज्ञानशास्त्र व अनुभव ह्यांस पूर्ण संमत आहे. ह्या संबंधानें दुसरी एक गोष्ट एथें सांगणें रास्त आहे ती अशी कीं वैद्यानें रोग्यास औषध देऊन बरें करणें हें जसें त्याचें एक काम आहे त्याचप्रमाणें रोगाचा प्रतिबंध करणें व अशा रीतीनें मनुष्यजातीची सुधारणा करून तिच्या सुखाचीं साधनें वाढविणें, अर्थात् स्त्रिया व पुरुष ह्यांमध्यें त्यांच्या परस्परसंबंधाच्या अवश्य अशा ज्ञानाचा फैलाव करणें हेंही त्याचें एक काम आहे. लहान वयांत स्त्रीपुरुषांचा संबंध झाल्यानें काय अनहित होतें ह्यासंबंधाचें उपयुक्त ज्ञान त्यांस त्याच्याकडून मिळालें पाहिजे. तसेंच ऋतुदर्शन व संभोगावस्था ह्या एकाच अर्थाच्या वाचक अशा संज्ञा नसून ह्या दोन निरनिराळ्या अवस्था आहेत व ह्या निरनिराळ्या काळीं कांहीं वर्षांच्या अंतरानें प्राप्त होतात, व पहिल्या स्थितींत संतति होण्याचा केवळ संभव असतो व दुसऱ्या स्थितींत तत्संबंधी अवश्य अशी योग्यता अंगीं येते, वगैरे गोष्टी, स्वतांच्या दुःखदायक अनुभवावरून कित्येक स्त्रियांस माहीत झालेल्या असतात तरी त्या वैद्याकडून सर्व स्त्रियांस समजाव्या हें योग्य आहे." (पार्व्हिनकृत प्रसवविद्या, पृ० ९१ ).

असो, यावरून इत्यर्थ काय निघतो, तर स्त्री असो किंवा पुरुष असतो, त्यांच्या शरीरांतील सर्व अवयव जेव्हां

पूर्ण दशेस येऊन पोंचतात, अर्थात् प्रौढावस्थेच्या सर्व लक्षणांचा जेव्हां त्यांच्या ठिकाणीं प्रादुर्भाव होतो, तेव्हांच संतत्युत्पादनाचे कामीं त्यांची योग्यता ठरते, व ही योग्यता सदरील लक्षणांपैकीं फक्त एखाद्या क्षुल्लक व अनिश्चित अशा लक्षणाचा प्रादुर्भाव झाल्यानेंच ठरवितां येत नाहीं. पुरुषास दाढी येणें, आवाजांत बदल होऊन त्यांत घोगरेपणा प्राप्त होणें, शरीराच्या बांध्यांत प्रशस्त फेरफार होणें, व स्वभावांत पोक्तपणा येणें इतक्या गोष्टी जेव्हां घडून याव्या तेव्हां त्यास प्रौढावस्था प्राप्त झाली असें समजावें. त्याचप्रमाणें स्त्रियांची छाती, त्यांचा कटिपश्चाद्भाग, व त्यांच्या शरीरांतील अस्थि व स्नायु, यांत जे या वयांत प्रशस्त फेरफार होतात ते एकदम होत नसून मध्यंतरी बराच काल जावा लागतो, ह्मणजे ते सर्व फेरफार व्हावे त्याप्रमाणानें होण्यास व स्त्रियांस प्रौढावस्था पूर्ण रीतीनें प्राप्त होण्यास सुरुवाती पासून बरींच वर्षे लोटतात व नंतर खरोखर स्त्रीत्व ह्मणून जें कांहीं आहे तें त्यांस प्राप्त होतें. ह्या सर्व घडामोडी त्यांच्या वयाच्या वीसाव्या वर्षाच्या आंत घडून येत नाहींत, आणि ह्या मुदतीच्या पूर्वींच जर त्यांच्या शरीरावर नुकसानीच्या अनेक बाबी येऊन थडकल्या व त्यांत ओहोटीचा प्रकार सुरू झाला, तर उघडच आहे कीं त्यांपासून त्यांच्या शरीराची ओढाताण होऊन प्रौढावस्था प्राप्त होण्याची ती न होतां तिला अवश्यमेव प्रतिबंध होईल, अर्थात् माता व बालक या उभयतांसही त्यापासून वाईट परिणाम भोगावे लागतील, व ते तसे भोगावे लागतात हें तुह्मी पाहतच आहां. वीसाव्या वर्षापासून पंचवीसाव्या वर्षाच्या दरम्यान ज्या देशांत स्त्रियांचा पुरुषांशीं संबंध होतो, अर्थात्

पूर्ववयांत मातृत्व प्राप्त न झाल्यामुळें जेथें स्त्रियांची पूर्वीं सांगितल्याप्रमाणें खराबी होत नाहीं, अशा देशांत देखील असें ह्मटलेलें ऐकूं येतें कीं आईच्या पसतीसाव्या वर्षापासून तों चाळीसाव्या वर्षाच्या दरम्यान जी मुलें होतात तीं फारच सशक्त निपजतात, व आईचें हें जें तारुण्याच्या भराचें वय तें संतति होण्यास फारच उत्तम ठरतें.

- आतां स्त्रियांत प्रौढावस्था प्राप्त होण्याच्या पूर्वींच पुरुषांशीं संबंध ठेविल्यानें जे अनेक व लक्षांत ठेवण्यासारखे तोटे होतात ते येणें प्रमाणें:-

(१). प्रथमत: या देशांतील स्त्रियांच्या ठिकाणीं संततीचा अटकाव करणारें हें एक मुख्य कारण होऊन बसलें आहे. ह्या संबंधानें मला असा एक मोठा चमत्कार वाटतो कीं, संततीची तुह्मांमध्यें जात्याच अत्युत्कट इच्छा वसत असते, व संततीशिवाय इहलोकीं व परलोकीं आपलें जिणें व्यर्थ असा तुमचा खरोखर समज झालेला असतो, तथापि त्या संबंधानें तुमच्या कृति मात्र विलक्षण रीतीनें उलट प्रकारच्या होत आहेत. किंबहुना ह्या संबंधाच्या तुमच्या इच्छा सफळ न होण्याच्या कामीं मानवाच्या बुद्धीस जे जे कांहीं उपाय सुचण्यासारखे आहेत ते ते सर्व तुमच्या हातीं तुह्मी करीत आहां. प्रौढावस्था प्राप्त होण्यापूर्वींच मुलांची व मुलींची लग्नें करणें, स्त्रियांस परतंत्र ठेवणें, प्रसवानंतर माता व बालक या उभयतांची शुश्रूषा गैरशिस्त प्रकारें ठेवणें, ह्या सर्व गोष्टी, तुमच्या संततीचा केवळ अमानुष व भयंकर अशा रीतीनें उच्छेद करीत असून, तिचा प्रसार होऊं देत नाहींत, व या गोष्टीकडे तुमचें अद्याप लक्ष पोंचत नाहीं हें मोठें आश्चर्य आहे.

परंतु वास्तविक यांत आश्चर्य वाटण्यासारखें तरी काय आहे? कारण, स्त्रिया ह्मणजे केवळ पुरुषांच्या सुखास साधनीभूत होणारे केवळ गाईह्मशींसारखे प्राणी, त्यांस स्वतांचें सुखदुःख असें कांहींच नाहीं, त्यांचा पुरुषांनीं आपल्या सुखाकरितां पाहिजेल तसा उपयोग करावा, व असें करणें हें केवळ धर्मसंमत आहे, असा जेथें सार्वत्रिक समज होऊन बसला आहे तेथें असाच परिणाम व्हायाचा हें उघड आहे. परंतु त्यांत तुमच्या स्वतांच्या संबंधाचा असा दुसरा एक प्रकार होत आहे तो तरी निदान तुह्मीं अवश्य लक्षांत ठेवण्यासारखा आहे. मनुष्य स्वार्थास गुंतून केवळ क्षणिक अशा सुखाच्या एकवेळ नादीं लागला, ह्मणजे तो मोठ्या व कायमच्या अशा दुसऱ्या सुखांस अंतरतो हा जो सृष्टिनियम आहे त्यास अनुसरून तुमची हल्लीं स्थिति होत आहे. मोठमोठीं कामें करण्याचें तुमच्या पूर्वजांचें सामर्थ्य तुह्मां मधून नाहींसें होत चाललें आहे व दिवसेंदिवस तुह्मीं कमकुवत होत चालला आहां हें केवळ तुमच्या स्वार्थी-पणाचें फळ आहे ही गोष्ट तुह्मांस विसरतां कामा नये. असो, स्त्रियांच्या ठिकाणीं अशा प्रकारें संततीचा अभाव होणें हा देखील त्यांचाच दोष आहे असें समजण्याचा या देशांत स्त्रियांमध्यें देखील परिपाठ पडून गेला आहे. परंतु हाही एक तुह्मां लोकांचा गैरसमजच आहे असें ह्मणणें प्राप्त आहे. युरोप व अमेरिका खंडांत, संततीचा अभाव असणाऱ्या अशा प्रत्येक सहा स्त्रियांत एक स्त्री नवऱ्याच्या दोषामुळें संततीविरहित राहते असा एक अजमास काढण्यांत आला आहे. परंतु तुह्मां हिंदु लोकांत बालविवाह जारीनें चालू असल्यामुळें पुरुष व स्त्रिया हीं उभयतां प्रौढावस्थेप्रत

जाण्यापूर्वीच त्यांचा वैवाहिक संबंध सुरू होतो, व संपूर्ण प्रौढावस्था प्राप्त झाल्यानंतर जो संबंध वास्तविक सुरू होणें इष्ट आहे त्याजविषयीं बाल्यावस्थेपासूनच त्यांच्या मनांत एकसारखे विचार घोळत असतात, व यामुळें स्त्रीपुरुषांचा होणारा जो संबंध त्याच्या संबंधानें अनेक प्रकारचा अनियमितपणा व अनाचार घडून येतो, याकारणांवरून हें जें संतति न होण्याच्या संबंधाचें स्त्रीपुरुषांतील दोषांचें मान तें याहूनही पुष्कळ अधिक आहे, ह्मणजे स्त्रियांपेक्षां पुरुषांकडे त्या दोषाचा पुष्कळ अंशीं अधिक संबंध दिसून येतो. मी या मुंबई शहरांत आल्या दिवसापासून ज्या अनेक स्त्रियांना दवाखान्यांत किंवा त्यांच्या घरीं औषधोपचार केले आहेत त्यांपकीं निम्मेहून अधिक स्त्रियांच्या संबंधानें मला असें ह्मणण्यास कांहीं एक हरकत दिसत नाहीं कीं त्यांची विकृति नवऱ्याच्या संबंधाच्या कांहीं ना कांहीं तरी कारणावरून उत्पन्न झालेली असावी. स्त्रिया प्रौढावस्थेंत येण्यापूर्वीं त्यांच्याशीं संबंध ठेवणें हें अशापैकींच एक सबळ कारण असून तें नवऱ्याच्याच माथीं लादलें पाहिजे हें उघड आहे, कारण त्यांत स्त्रीचा कांहींएक दोष नसून केवळ तिच्या इच्छेविरुद्ध तो अशा कृत्यास प्रवृत्त होत असतो. दुसरीं अशीं कांहीं उदाहरणें माझ्या पाहण्यांत आलीं आहेत कीं त्यांत अल्पवयांतच स्त्रियांना मूल झाल्यामुळें त्यांचीं पक्क दशेस न आलेलीं अशीं जननेंद्रियें इतकीं कांहीं प्रसवकाळच्या त्रासांनीं—मूल बहुधा गर्भांतच मेलेलें असल्यामुळें-बिघडून गेलेलीं असतात कीं तीं पुढें गर्भधारण करण्यास अगदीं असमर्थ होतात. या संबंधानें मीं पुढील तीन

अनुमानें काढिलीं आहेत तीं, सद्गृहस्थहो, तुमच्या स्वतांच्या अनुभवास पटत असल्यास पहा.

(१). तेराव्या किंवा चौदाव्या वर्षीं स्त्रीचा पुरुषाशीं वैवाहिक संबंध सुरू झाल्यास त्यापासून तिच्या जीवास धोका जरी न प्राप्त झाला तरी, तिची प्रकृति सतत कांहीं ना कांहीं कारणावरून बिघडलेली असते व तिच्या ठिकाणीं संततीचा अभाव दिसून येतो.

(२). ज्या स्त्रियांस अशा अल्पवयांत मूल होतें, त्यांस पुनः गर्भधारणाची शक्ति राहत नाहीं व मुलें होत नाहींत.

(३). चौदाव्या वर्षापर्यंत पुरुषाशीं संबंध होऊं न दिला तरी ज्या स्त्रियांच्या ठिकाणीं भर्गधारण नंतर ताबडतोब घडून येतें त्या स्त्रियांमध्यें पुढें संततीचा अभाव दिसून येतो. सशक्त व निरोगी स्त्रिया असल्या ह्मणजे तीन चार वर्षें गेल्याशिवाय त्यांस मुलें होत नाहींत—वास्तविक त्यांस तोंपर्यंत प्रौढावस्था प्राप्त झाली नसते याचा हा एक पुरावाच होय. सदरील गोष्टींस अपवाद ह्मणून आहेच, परंतु एकंदरींत तुमच्या अनुभवावरून हाच बहुशः घडून येणारा सार्वत्रिक प्रकार असें तुह्मांस ह्मणतां येणार नाहीं काय ?

२. प्रौढावस्था प्राप्त होण्यापूर्वींच स्त्रीपुरुषांचा वैवाहिक संबंध सुरू झाल्यामुळें दुसरा एक तोटा होतो तो असा कीं, अशा रीतीनें झालेली अल्पवयी स्त्रियांची संतति अगदीं खुरटी व रोगी अशी निपजते. सारांश, या चालीच्या पायीं, हजारों मुलें जन्मास येण्या पूर्वींच काळाच्या मुखांत पडतात व हजारों जन्मास येऊन नंतर हा लोक सोडून परलोकची वाट धरतात, व शिवाय मरतमढे, कयाहीन,

व्याधिग्रस्त व कुरूप अशा लोकांची संख्या जर दिवसेंदिवस तुह्मांमध्यें वाढत आहे, आणि या सर्व गोष्टी तिच्या [illegible] व्यक्त करीत आहेत. सद्गृहस्थहो, जनावरांच्या ठिकाणीं देखील तुमची दयार्द्र बुद्धि फार दिसून येते, परंतु तुमच्या स्त्रिया व तुमचीं मुलें यांचा तुह्मीं केवळ संहार मांडला आहे असें ह्मणणें प्राप्त होतें. तुमच्या पायीं तुमच्या स्त्रियानां असह्य अशीं दुःखें प्राप्त होतात, व त्या अकाली मृत्यूच्या स्वाधीन होतात किंवा यावज्जन्म दुःखांत रेंगाळत पडतात. ही दुसरी स्थिति तर फारच भयंकर होय. कारण, अशा स्थितींत त्या गरीब बिचाऱ्या स्त्रियांस संसारांत जीं कांहीं सुखें ह्मणून असतात व ज्यांच्यायोगें मनुष्यास या जगांत राहावें असें वाटतें त्यांपैकीं एकही प्राप्त होत नसून तें पुढेंमागें प्राप्त होण्याची त्यांस आशाही नसते. बरें शरीरांतील वेधना एकीकडेस ठेवून परमार्थाच्या किंवा तशासारख्या दुसऱ्या कांहीं गोष्टींत मन घालावें तर त्यास अवश्य असें जें मानसिक शिक्षण तेंही पण त्यांस मिळालेलें नसतें. ही त्यांची अल्पवयांत ह्मातारपणासारखी झालेली बापुडवाणी स्थिति पाहून, तुह्मांपैकीं कोणास बरें, सांगा पाहूं, आपल्या अविचारी कृतीचें स्मरण होत नाहीं, व आपण स्वतां त्यांच्या नाशास कारण झालों असून त्यांच्याकडून सर्वस्वीं दोष लावले जाण्यास पात्र झालों आहों अशी कल्पना कोणाच्या बरें मनांत येत नाहीं ? तसेंच ज्या तुमच्या मुलांवर तुह्मी इतकी प्रीति करतां व ज्यांस आपल्या वृद्धापकालचा आधार असें समजतां अशा तुमच्या मरतमळ्या मुलांच्या पांढऱ्या फिकट तोंडांकडे पाहून तुमच्या मनांत असा विचार कधींच कां येत नाहीं कीं अशा मुलांनीं जर

अन्यरीतीनें तुह्मीं त्यांजवर केलेले उपकार न स्मरतां त्यांचा योग्य मोबदला तुमच्या ह्मातारपणीं तुह्मांस दिला नाहीं, व अशा रीतीनें दुःख भोगण्याकरितां त्यांस जन्साए घातल्याचें श्रेय तुह्मीं घेतलें ह्मणून त्यांनीं तुमचा तिरस्कार केला, किंबहुना तुमची वल्गना केली, तर त्यांचें हें करणें गैरवाजवी असें तुह्मांस ह्मणतां येणार नाहीं? या संबंधानें वास्तविक तुमची कशीही समजूत असो, परंतु माझी तर अशी पक्की समजूत झाली आहे कीं त्यांत त्यांच्याकडून कांहीं एक गैर होणार नाहीं. कारण, त्यांच्या नानाविध भयंकर क्लेशांस तुह्मी, व केवळ तुह्मी, कारण झालां आहां. रात्रंदिवस सतत व्याधीनें पीडित असल्यामुळें त्यांच्या तोंडांवर पांढरकी आली आहे, त्यांची मुद्रा भेकड झाली आहे, शरीरें वेडींविद्रीं झालीं आहेत, हीं सर्व तुमच्या कृतींचीं फळें होत. अशा जरत्करू मुलांचे जन्मदाते ह्मणविण्यास तुह्मांस खरोखर लाज वाटावी! अशा संततीच्या योगें तुह्मो आपलें नांव मागें ठेवूं पाहतां, परंतु लक्षांत ठेवा कीं त्यांच्याकडे पाहून लोकांच्या मुखावाटें "हे पाहा आपल्या वडिलांच्या पापांचे अधिकारी होऊन बसले आहेत!" असे उद्गार आल्यावांचून कधीं राहणार नाहींत.

आतां कदाचित् तुह्मी असें ह्मणाल कीं "जर प्रजोत्पादनाचें काम एखाद्या मनुष्याकडून होत आहे तर अर्थात् त्याच्या ठिकाणीं ती योग्यता असलीच पाहिजे, व अशी योग्यता असल्याशिवाय प्रजोत्पादन त्याजकडून होणेंच नाहीं." परंतु असें नाहीं. जगांत तुमच्या भोंवतालीं काय चाललें आहे तें तुह्मी नीट लक्ष लावून पहा, ह्मणजे तुमच्या ह्मणण्याचा खोटेपणा तुह्मांस दिसून येईल. पक्ष्यां-

मध्यें देखील त्यांचीं पहिलीं अंडीं जीं असतात तीं आकारानें लहान व पोचट असून प्रजोत्पादनाचे कामीं त्यांचा उपयोग बहुधा होत नसतो. एखादी नवी तरणी कोंबडी असली ह्मणजे तिची पहिलीं अंडीं खराब होण्याचा विशेष संभव असून, पिलें काढण्याच्या कामीं त्यांचा उपयागे केलाच तर खुराड्यांतील सर्व कोंबड्यांची खरात्री होते हें कदाचित् तुह्मांपैकीं पुष्कळांस माहित नसेल. परंतु या संबंधानें वास्तविक प्रकार मला माहित आहे तो असा कीं एखाद्या तरण्या कोंबडीनें अंडीं घालण्यास पहिल्यानेंच सुरुवात केली ह्मणजे लागलीच त्या अंड्यांचा पिलें काढण्याच्या कामीं उपयोग करीत नसतात. परंतु तीच कोंबडी कांहीं महिने गेल्यानंतर शरीरानें चांगली भरली व पुष्ट दिसूं लागली व तिच्या अंड्यांचा आकारही व्हावा तसा मोठा झाला ह्मणजे खुराड्याचा मालक वरील कामीं त्यांचा उपयोग होऊं देतो, आणि अशा रीतीनें जी संतति पैदा होते तींत कांहीं एक गोम राहत नाहीं व तिच्यामुळें खुराड्यांतील सर्व कोंबड्या पुष्टच्या पुष्ट राहून त्यांची अवलाद बिघडत नाहीं.

३. हे अनिष्ट परिणाम सुरू झाले ह्मणजे कालांतरानें प्रत्येक कुटुंबांत अधिकाधिक वाढत जातात. पूर्वीं सांगितलेंच आहे कीं स्त्रियांच्या वीसाव्या वर्षीं पुरुषांशीं संबंध झाला ह्मणजे त्यांचें वय चाळीस वर्षांचें होई तोंपर्यंत त्यांच्यापासून होणारी संतति अधिकाधिक सशक्त व जोरदार होत जाते. परंतु तोच याच्या उलट प्रकार झाला, अर्थात् प्रौढावस्था प्राप्त होण्याच्या पूर्वींच मातृत्वाचा अधिकार त्यांस प्राप्त झाला तर परिणामही उलटच होणार हें उघड

आहे. प्रत्येक प्रसवकाळच्या होणाऱ्या त्रासामुळें माता अधिकाधिक कमकुवत होत जाते, व तिचीं बालकेंही अधिकाधिक रोगी निपजत जातात. मातृत्वास अवश्य अशी पौढावस्था प्राप्त होण्यापूर्वींच प्रसवाची ताण तिच्यावर येऊन पडते यामुळें, तिच्या योगें मुलाची, व मुलाच्या योगें तिची अशी परस्पर खराबी होऊन शेवट परिणाम असा होतो कीं उभयतांच्या शरीरांत कांहीं त्राण राहत नाहीं व उभयतांचीही वाढ खुंटत जाते.

४. प्रत्येक कुटुंबांत अशा प्रकारें अनिष्ट प्रकार घडून येऊं लागले, तर सद्गृहस्थहो, एकंदर राष्ट्रावर त्याचा काय बरें परिणाम होईल ? माझ्या मतें तर आस्तेआस्तें त्या सर्व राष्ट्राची अशानें खचित पायमल्ली झाली पाहिजे; अर्थात् तें सर्व राष्ट्र निःसत्व होऊन शेवटीं निकृष्टावस्थेमत जाऊन पोंहोचलें पाहिजे, व, सद्गृहस्थहो, सांप्रत तुह्मांलोकांस अशी स्थिति प्राप्त झाली नाहीं असें तुह्मांस वाटतें काय ? मुसलमान लोकांच्या ह्या देशावर स्वाऱ्या झाल्या त्यावेळेपासून या देशांत ही बालविवाहाची व स्त्रियांस पडद्यांत ठेवण्याची चाल सुरू झाली. त्या पूर्वींची जी तुह्मां लोकांची स्थिति इतिहासांत वाचण्यांत येते तशी सांप्रत तुमची स्थिति आहे असें तुह्मी समजतां काय ? तर मग त्या काळचे ते बलाढ्य व शूर रजपूत व मराठे, व त्यांचीं तीं मेहनतीनें कसलेलीं शरीरें तसेंच त्यांचें तें बुद्धिवैभव हीं आतां कोठें बरें आहेत ! माझ्या मतें तर आज कितिएक शतकें ही बाल-विवाहाची अनिष्ट चाल तुह्मांमध्यें चालू असल्यामुळें तिच्या पायीं तुह्मी केवळ अर्भकांचीं अर्भकें होऊन बसलां आहां, व असाच क्रम कांहीं काळ पर्यंत चालू राहिल्यास तुमचें

स्वातंत्र्य अगदीं नष्ट होऊन जाईल व तुह्मांस गुलामांचें गुलाम बनविण्यास दुसरा बलवत्तर असा उपाय शोधण्याची जरूरी राहणार नाहीं.

अतां, तुह्मांपैकीं कोणी असें ह्मणतील कीं "ही आमच्या धर्माची आज्ञा आहे व ही आह्मांस पाळलीच पाहिजे." तर त्यास माझें असें उत्तर आहे कीं धर्म ह्मणून जो कांहीं आहे त्यांत आपला ईश्वराशीं संबंध व मानव जातींशीं आपलीं कर्तव्यकर्मे ह्यांचाच फक्त समावेश होत असतो, व ह्या दोन्ही बाबी मनुष्यजातीचें अनहित करणारी अशी कोणतीही गोष्ट करण्यास कधींही सांगणार नाहींत, एवढेंच नव्हे तर उलट तिचा प्रतिबंधच करतील. या संबंधानें येथें दुसरी अशी एक गोष्ट सांगणें जरूर आहे कीं स्त्रीजातीच्या संबंधाच्या जेवढ्या ह्मणून अपकारक अशा चाली आहेत तेवढ्या सर्व त्यांच्यावर धर्माच्या नांवानें आजपर्यंत लादण्यांत आल्या आहेत, आणि यामुळें असें झालें आहे कीं स्त्रियांस त्या किती जरी त्रासदायक होत असल्या तरी त्यांत बदल करण्याच्या कामीं पुरुषांपेक्षां त्या नेहमी मागेंच असतात, व अशा कामीं त्यांची संमति बहुधा मिळत नसते. शिवाय मानवानें मानवास छळण्याकरितां युगांतरापासून ज्या ज्या युक्ति लढविल्या आहेत व जीं जीं अपकारक कृत्यें केलीं आहेत त्या सर्वांत असें एकही कृत्य तुमच्या दृष्टीस पडणार नाहीं कीं ज्याला त्यानें धर्माचें स्वरूप देऊन अज्ञानी जनांस तें ग्राह्य होईल असें केलें नाहीं. गुलामगिरीचा धंदाच कां घ्याना? त्यालाही आमच्या या एकूणीसाव्या शतकांत देखील धर्माचें स्वरूप देऊन खरा ह्मणणारे अनेक लोक आहेत. मनुष्याचे व इतर प्राण्यांचे बळी देण्यांत येतात तेही धर्मा-

च्याच नांवानें देण्यांत येतात ही गोष्ट तुह्मीं लक्षांत ठेवण्या-सारखी आहे. अशा धर्माच्या नांवानेंच थोड्या वर्षांपूर्वीं इंग्लंड देशांत स्त्रियांना चेटकी समजून ठार मारीत असत व अद्यापही हिंदुस्थानांतील कांहीं भागांत हा प्रकार सुरू आहे. असें जर आहे तर तुह्मां लोकांतील बालविवाहाच्या चालीस धर्माची संमति खरोखर मिळाली असल्यास त्यांत आश्चर्य तें कोणतें ?

असो, आतां शेवटीं माझी तुह्मांस एवढीच विनंति आहे कीं ह्या सर्व गोष्टींचा तुह्मीं नीट विचार करून ही बालविवाहाची चाल एकदम बंद पाडण्याची तुह्मीं अवश्य तजवीज करावी. कारण, माझी तर खरोखर अशी खात्री आहे कीं जर केवळ दुराग्रहानेंच या उपर तुह्मीं आपला प्रस्तुत क्रम चालू ठेवाल, व सृष्टिक्रमाविरुद्ध पूर्ववत् आचरण करूं पाहाल, तर तुमच्या राष्ट्रास दिवसेंदिवस अधिकाधिक निकृष्टावस्था प्राप्त होत जाईल, व जें इंग्रज सरकार सांप्रत तुह्मांवर राज्य करीत आहे त्याजकडून तुमच्या संरक्षणार्थ कितीही अन्य उपाय योजण्यांत आले तरी त्या सर्वांचा तुमचें नष्टचर्य टाळण्यास कांहींएक उपयोग होणार नाहीं, व कांहीं विघ्नसंतोषी लोक कंठरवानें ह्मणत असतात त्याप्रमाणें जरी कदाचित् इंग्रज लोकांस ह्या देशांतील राज्य सोडून स्वदेशीं जावें लागलें, तरी अशा प्रसंगीं दुसरें एखादें बलिष्ठ राष्ट्र पुढें सरसावून त्यांच्या जागीं येईल व तुह्मांस हां हां ह्मणतां पादाक्रांत करून टाकील, किंबहुना जे कोणी तुह्मांप्रमाणें जरत्कारूच्या वंशांतले नाहींत व ज्यांनीं सशक्त, निरोगी व सदृढ अशा आई-बापांच्या पोटीं जन्म घेतला आहे व अशा आईबापांचें रक्त ज्यांच्या शरीरांत वाहत आहे अशा कोणत्याही एखाद्या बलिष्ठ

राष्ट्राचे तुह्मीं केवळ दास बनाल, व लाकूडफोडे, मोळीविके अगर पाणी भरणारे अशांची योग्यता तुह्मांस प्राप्त होऊन त्यांच्या आश्रयानें दिवस काढण्याची तुह्मांस पाळी येईल हें तुह्मी खचित समजा.

---

# विवाहितबालाविलाप.

## शेवटची मागणी.

### पद.

सखियानो ! कारण माझ्या दुखण्याचें ऐका बाई ! ॥ धृ० ॥
सातवेंच वरुषीं वडिलीं कुतुकास्तव वऱ्हाड केलें;
साहजीक सासुरवासें रात्रंदिन भय मज जडलें;
ह्मणूं नये ' अधाशी ' ह्मणुनी, अन्न बळें मींच त्यजीलें;
पोरपणें थोडें खावें, इतरांच्या पूर्वि उठावें,
उद्योगीं दक्ष असावें; झाली मग निःशक्ताई !
सखियानो, कारण माझ्या दुखण्याचें ऐका बाई ! ॥ १ ॥
वर्ष तें दहावें जातां, " न्हाण नये " ऐसी चिंता
वाटून, सासूबाई युक्ति पुसति कोणी येतां;
एके मग ह्मातारीनें कसलेसें औषध देतां,
घाया परि कंबर दुखुनी, कोसळली अविरत धुपणी !
हर्ष परी उभय स्वजनीं ! न्यालें मी पण करुंन्हाई !
सखियानो, कारण माझ्या दुखण्याचें ऐका बाई ॥ २ ॥
सोहळा पुरा तिहिं केला आनंदें; मज तें मरण !
तेंच दिनीं, नातू व्हावा ह्मणुनीयां, श्रीतें शरण
जाउन, मज सासूबाई करवीति व्रत आचरण;
दैववशें तिसरी पाळी चुकुनी, तें आलें भाळीं
गर्भिणीत्व भलत्या काळीं; करवाया मृत्युस घाई !
सखियानो, कारण माझ्या दुखण्याचें ऐका बाई ! ॥ ३ ॥

आंथरुणावर म्यां क्रमिले मास नऊ मोठ्या त्रासें;
पुत्रवदन नांवापुरतें पाहियलें तें सायासें;
अतिशय कृश बालक बघतां, दिसलें मज वांचेनासें,
त्यांत मला तापहि भरला; दुग्धाचा थेंबहि नुरला;
अनुबंध ऋणाचा सरला; कुठची मग त्याला आई ?
सखियानो, कारण माझ्या दुखण्याचें ऐका बाई ! ॥ ४ ॥
बाराव्या वर्षी बसला सुतशोकाचा हा धक्का;
तापहि तो गेला नाहीं; अस्थिज्वर बनला पक्का;
बाळंतरोगाचा तें मजवरती बसला शिक्का;
खोकला हळू सुरु झाला; पूर्विंच जी शक्ति लयाला
गेली, ती येइ कशाला ? खातें तरि कोठें कायी ?
सखियानो, कारण माझ्या दुखण्याचें ऐका बाई ! ॥ ५ ॥
अस्तु; अतां सौभाग्यानें मरतें, हें मोठें भाग्य !
मानुनियां, अंतःकरणीं समाधान धरणें योग्य;
परि, सुनांमुलींचें तुमच्या राहावें स्थिर आरोग्य,
एवढीच इच्छा धरुनी, मरतानां आग्रह करुनी,
मागें मी; तें द्या स्मरुनी, पूर्वींचा प्रेमा कांहीं !
सखियानो, कारण माझ्या दुखण्याचें ऐका बाई ! ॥ ६ ॥
हीच असे शेवटची हो ! मागणी पदर पसरून;
कीं, अतिशय लहान मुलिंचें न करावें सहसा लग्न;
लग्नांतीं यद्यपि आलें आपापल्यि लौकर न्हाण,
तरि, सोळा वर्षें होती तोंवर, तिस पुरुषा हातीं
घालुं नका, इतुक्या साठीं आळवितें, बहु शपथांहीं
सखियानो, कारण माझ्या दुखण्याचें ऐका बाई ! ॥ ७ ॥

पथ्यबोध मासिकपुस्तक ( गोवें ), पु० १, अंक ४.